Registered with the Registrar of Newspaper of india RNI/31743/63

## मराठी संशोधन मंडळाची अलीकडची नवी प्रकाशने !




संपादक-मुद्रक-प्रकाशक- डॉ. प्रदीप कर्णिक
संचालक, मराठी संशोधन मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई ४०००१४. दू.क्र. ०२२४१३४२११

वर्ष ६८ । जुलै - ऑगष्ट - सप्टेंबर २०२१ । अंक ४
ISSN-0542-6421
(U.G.C. No. 129)

# मराठी संशोधन पत्रिका



प्रख्यात संशोधक-समीक्षक

# डॉ. स. गं. मालशे जन्मशताब्दी विशेषांक

(२४ सप्टेंबर १९२१ - ७ जून १९९२)

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे
मराठी संशोधन मंडळ
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर मुंबई : ४०००१४.




**मा. शरश्चंद्र पवार साहेबांच्या हातून महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार स्वीकारताना डॉ. स. गं. मालशे**



महाराष्ट्र शासन

मराठीतील वाङ्मयनिर्मितीला
राज्य पुरस्कार
१९८७-८८
हा पुरस्कार
श्री. सखाराम गंगाधर मालशे यांना
प्रौढ वाङ्मय विभागात अधिक पुरस्कार
लेखन प्रकारातील स्पर्धेसाठी आलेल्या
पुस्तकांपैकी उत्कृष्ट ठरलेल्या
ऋणानुबंधाच्या गाठी या
पुस्तकासाठी देण्यात येत आहे.

मुंबई, दिनांक
२८-११-१९९०

शिक्षण मंत्री




महाराष्ट्र शासन

मराठीतील वाङ्मयनिर्मितीला
राज्य पुरस्कार
१९८८-८९
हा पुरस्कार
श्री. डॉ. स. गं. मालशे यांना
प्रौढ वाङ्मय विभागात समीक्षा आणि सौंदर्यशास्त्र
लेखन प्रकारातील स्पर्धेसाठी आलेल्या
पुस्तकांपैकी उत्कृष्ट ठरलेल्या
तारतम्य या
पुस्तकासाठी देण्यात येत आहे.

मुंबई, दिनांक :
२८-११-१९९०.

शिक्षण मंत्री




## मा. डॉ. भालचंद्र मुणगेकर यांचे नवे पुस्तक : अभिनंदन सर!

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे उपाध्यक्ष माजी खासदार आणि मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू मा. डॉ. भालचंद्र मुणगेकर यांचे नुकतेच लोकवाङ्मय प्रकाशन गृहातर्फे 'मी असा जगलो' हे आत्मचरित्र प्रकाशित झाले आहे, त्याप्रीत्यर्थ आम्ही त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. डॉ. मुणगेकर अर्थशास्त्राचे अभ्यासक - अध्यापक म्हणून जसे नामवंत आहेत, तसेच ते लेखक म्हणूनही प्रख्यात आहेत. इंग्रजी - मराठी भाषेत सिद्धहस्त लेखक म्हणून त्यांनी ख्याती प्राप्त केली आहे. 'मी असा घडलो' हे त्यांचे यापूर्वीचे पुस्तकही खूप गाजले होते. २००८ ते २०१९ या काळात या पुस्तकाच्या पंधरा आवृत्त्या प्रकाशित झाल्या होत्या. असेच यश 'मी असा जगलो' या पुस्तकालाही प्राप्त होवो सदिच्छा व्यक्त करतो.

– संपादक



## मा. दिनू रणदिवे पुरस्कार, पहिलाच मान मा. श्री. प्रताप आसबे यांना

ज्येष्ठ पत्रकार, स्वातंत्र्यसैनिक, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील अग्रणी, समाजवादी चळवळीतील दीर्घकाळ सक्रिय सहभागी असणारे नेते, ध्येयवादी पत्रकार आणि क्रियाशील कार्यकर्ते मा. आदरणीय श्री. दिनू रणदिवे यांच्या नावाने दिला जाणारा पहिलाच पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार, राजकीय विश्लेषक मा. श्री. प्रताप आसबे यांना जाहीर झाला आहे, त्याबद्दल आम्ही श्री. आसबे यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. प्रतिवर्षी महाराष्ट्रातल्या पत्रकारास हा पुरस्कार (रु. २५ हजार आणि सन्मानपत्र) दिला जाणार आहे.

– संपादक